**प्राधान्य/अतितात्काळ**

**क्र.पोमसं/१/५१/वैद्यकीय चाचणी-२०१७/१४५/२०१५,**
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई -४०० ००१.
दि. ०९ /०२/२०१७.

**संदर्भ :** (१) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.आय्पीएस्-३०१७/ प्र.क्र.३२/पोल-१, दि. १८/०१ /२०१७, व समक्रमांकित शुध्दिपत्रक, दि. ०३ फेब्रुवारी २०१७, ह्या कार्यालयाचे (२) समक्रमांकित पत्र, दिनांक २७/०१/२०१७, आणि
(३) बिनतारी संदेश NO.DGP/1/51/IPS-MEDICAL CHECKUP-2017 / 145/2015, दिनांक 27-01-2017.

**विषय :-** अखिल भारतीय सेवा (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ मधील तरतुदींनुसार करुन घ्यावयाची वैद्यकीय चाचणी.:

***

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी संदर्भ क्रमांक १ वरील शासन निर्णय हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर [(संकेताक २०१७०११८११५५५०२८२९), व (संकेताक २०१७०१२४१६४७४५६२२९)] उपलब्ध आहेत. तसेच, **www.mahapolice.gov.in** ह्या संकेत स्थळावर प्रसृत करण्यात आले आहेत.

२. तरी, सर्व भापोसे अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, वरील नमूद शासन निर्णयातील दिनाक ०३ फेब्रुवारी, २०१७, च्या शुध्दीपत्रकातील सूचनांच्या अनुषंगाने, व दिनांक १८ जानेवारी, २०१७ मधील सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन त्यांनी आवश्यक ती **वैद्यकीय तपासणी विहीत कालमर्यादेतच पूर्ण करुन** तसे ह्या कार्यालयास त्वरीत (कार्यासन क्रमांक-१ ला लक्षवेध करुन) कळवावे.

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्था.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांचेकरिता.

**प्रति,**

**सर्व भापोसे अधिकारी (सोबतचे यादीप्रमाणे)**

**प्रत :-**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, मुंबई.
२/- उपरोक्त शासन निर्णय पोलीस दलाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावा.

**प्रत :-**

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.-३२
(आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.)

अ.भा.से.(कार्य मुल्यांकन अहवाल) नियम, २००७ प्रमाणे भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांनी सन २०१६-२०१७ साठी करुन घ्यावयाच्या वैद्यकीय चाचण्या.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन शुध्दिपत्रक क्रमांकः आयपीएस-३०१७/प्र.क्र.३२/पोल-१**
२ रा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.
दिनांक: ३ फेब्रुवारी, २०१७

वाचा :- समक्रमांकाचा शासन निर्णय, दिनांक १८.०१.२०१७

**शुध्दिपत्रक :-**

उपरोक्त शासन निर्णयातील प्रस्तावनेतील दुसऱ्या ओळीतील "या नियमांतील नियम ३ व त्यासोबतच्या नियम ४ अनुसार, दिनांक ३१.०३.२०१६ रोजी ४० वर्षे किंवा अधिक वय असलेल्या राज्यातील भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांनी त्यांच्या वैद्यकीय तपासण्या, ठरवून दिलेल्या नमुन्यात, प्रतिवर्षी करुन घेणे बंधनकारक असून, त्यांच्या वैद्यकीय तपासणीच्या अहवालाचा सारांश, वार्षिक कार्यमुल्यांकन अहवालासोबत जोडणे आवश्यक आहे." याच्याऐवजी **"या नियमांतील नियम ३ व त्यासोबतच्या नमुना ४ नुसार, तसेच, गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या पत्र क्र. १७०११/3/२००३-आयपीएस-II, दिनांक २१.११.२००८ नुसार राज्यातील सर्व भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांनी त्यांच्या वैद्यकीय तपासण्या, ठरवून दिलेल्या नमुन्यात, प्रतिवर्षी करुन घेणे बंधनकारक असून, त्यांच्या वैद्यकीय तपासणीच्या अहवालाचा सारांश, वार्षिक कार्यमुल्यांकन अहवालासोबत जोडणे आवश्यक आहे."** असे वाचण्यात यावे.

२. तसेच, शासन निर्णयाखालील परिच्छेद क्र. १ "अखिल भारतीय सेवा (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ मधील नियम, ३ व त्यासोबतच्या नमुना ४ अनुसार, दिनांक ३१.०३.२०१६ रोजी ४० वर्षे किंवा अधिक वय असलेल्या भारतीय पोलीस सेवेतील सर्व अधिकाऱ्यांनी, त्यांच्या वैद्यकीय तपासण्या, सन २०१६-१७ या वर्षी सोबतच्या प्रपत्र "अ" प्रमाणे विभागनिहाय मान्यता दिलेल्या नामांकित खाजगी रुग्णालयातून करुन घेणे आवश्यक आहे" त्याऐवजी **"अखिल भारतीय सेवा (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ मधील नियम, ३ व त्यासोबतच्या नमुना ४ अनुसार, तसेच, गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या पत्र क्र. १७०११/3/२००३-आयपीएस-II, दिनांक २१.११.२००८ नुसार भारतीय पोलीस सेवेतील सर्व अधिकाऱ्यांनी, त्यांच्या वैद्यकीय तपासण्या, सन २०१६-१७ या वर्षी**

419
3/2/17
197/17
4/2/2017

**सोबतच्या प्रपत्र "अ" प्रमाणे विभागनिहाय मान्यता दिलेल्या नामांकित खाजगी रुग्णालयातून करुन घेणे आवश्यक आहे"** असे वाचण्यात यावे.

३. तसेच, संदर्भाधीन शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र-अ मधील अ.क्र.५ औरंगाबाद विभाग समोरील हेगडेवार रुग्णालयासमोरील संपर्क अधिकारी व दूरध्वनी क्रमांक या रकान्यात "डॉ. अजय शिंदे, Mob.-९८२२१९४१४३ Hos.- ०२४०-६६०११५७ Email ID-mgmmcri@gmail.com" असे नमूद करण्यात आले आहे. त्याऐवजी सदर रकान्यात **"श्री. दौलत लोखंडे, रुग्णालय प्रशासक, Mob.-९८२२५६१४५३ Hos.-०२४०-२३३११९५"** असे वाचण्यात यावे.

४. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१७०१२४१६४७४५६२२९ असा आहे. हे शुध्दिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(तुषार महाजन)
अवर सचिव, गृह विभाग

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई /नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
५. महाराष्ट्र संवर्गातील भारतीय पोलीस सेवेतील सर्व अधिकारी (पोमसं यांचे मार्फत)
६. प्रपत्र-अ मधील सर्व खाजगी रुग्णालये
७. वित्त विभाग (सेवा-५),मंत्रालय,मुंबई.
८. निवड नस्ती.